॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १६ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापैकी आज दि. १६ जानेवारी २०२६ रोजी पंधरवड्याचे दुसरे पुष्प गुंफत 'कथाकथन' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यासाठी जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबार येथील प्रा. डॉ. माधव कदम यांना आमंत्रित करण्यात आले होते. तर अध्यक्षस्थान भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांचे विभाग प्रमुख माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी भूषविले. गोष्ट सांगणे आणि ऐकणे हा मानवी स्वभाव आहे. तसेच हसणं आणि रडणं हे देखील माणसांच्या नैसर्गिक भावनांमध्ये येत असल्याचे मनोगत व्यक्त करून याप्रसंगी प्रा. डॉ. माधव कदम यांनी साने गुरुजी लिखित 'श्यामची आई' या पुस्तकातील गोष्टींचे कथाकथन सादर केले. यात भित्रेपणामुळे श्यामच्या पोहण्याला न जाण्याची गोष्ट सादर करत असताना श्यामचा भित्रेपणा त्याच्या आईने घालवण्यासाठी प्रसंगी त्याला मारले होते. यासोबतच एका गोष्टीत श्याम आंघोळीच्या वेळी आईला त्याचे अंग पदराने पुसायचे म्हणतो आणि यावर तो न थांबता पुढे पायाला घाण लागू नये म्हणून आईला पदर पसरायला सांगतो. त्यावेळी श्यामची आई म्हणते, 'श्याम बाळा पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस, तशीच मनालाही घाण लागू नये म्हणून जप हो' या वाक्यातून श्यामच्या आईचा संस्कारमयपट 'श्यामची आई' या पुस्तकातील कथांमधून प्रा. डॉ. माधव कदम यांनी उलगडून दाखवला.

या कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय मनोगतात कथाकथनाच्या सादरीकरणाचे सूत्र सांगत माननीय प्रा.डॉ.म.सु.पगारे म्हणाले की, कथाकथनाचे सादरीकरण ही एक सापेक्ष शैली आहे आणि आवाजाचा आरोह-आवरोहानुसार प्रत्येक व्यक्तीगणिक ती शैली अतिशय प्रभावी होत असते. त्यामुळे कथाकथन करत असताना वक्त्याला स्वतःला त्यात विरघळता आले पाहिजे. त्यालाच तादात्म्य पावणे असे म्हणतात. हे तादात्म्य त्याच्या ज्ञानसाधनेमुळे सिद्ध होते वक्त्याने त्या कथाकथनातून केलेली रुजवात ही श्रोत्यांना आयुष्यभर सूत्ररूपात जगता येते. असे प्रभावित करणारे कथाकथन ऐकल्यावर श्रोते झपाटून जातात. त्यामुळे कथेतून झालेले मूलगामी स्वरूपाचे प्रक्षेपण हे शुद्धतेच्या पातळीवर पोहोचते. या शिवाय साने गुरुजींविषयी उद्गार काढताना माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे म्हणाले की, जसे जिजाऊ माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवले आणि जगासमोर एक महापुरुष उभा राहिला तसेच श्यामला घडविणारी आई ही संस्काररुपी मातृत्वाचे धैर्यपूर्ण सूत्र म्हणून प्रकट होते. यासोबतच साने गुरुजींच्या साहित्यावर रडके साहित्य अशी टीका करणाऱ्यांना सांगताना माननीय अध्यक्ष म्हणाले की, साने गुरुजींचे हृदय इतके मऊ होते परंतु 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' ही कविता त्यांच्या कणखरबाण्याची साक्ष असल्याचे दुर्लक्षून चालणार नाही. यासोबतच साने गुरुजींच्या एका कादंबरीचा संदर्भ घेऊन तहसीलदार झालेल्या बाळासाहेब नावाच्या मुलाने शिकून मोठे झाल्यावर आई-वडिलांना विसरून शहरात स्वतःचा संसार थाटला होता परंतु कालांतराने त्याला पश्चाताप होऊन त्याच्या डोळयातून निघालेले अश्रू यासोबतच त्याच्या आईसोबत त्याच्या मिलनाची गोष्ट सांगत अध्यक्षीय मनोगताचा समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात तर आभार नेहा लाम्हणे यांनी केले. तसेच कार्यक्रमाला मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १६ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता